| 11. | Recommendation on the Open offer, as to whether the offer is fair and reasonable | The IDC members believe that the open offer is fair and reasonable. However, the shareholders should independently evaluate the offer. |
| 12. | **Summary of reasons for the recommendation**<br>(IDC may also invite attention to any other place, e.g. company's website, where its detailed recommendations along with written advice of the independent adviser, if any can be seen by the shareholder ) | IDC has taken into consideration the following for making recommendation:<br>1. Public Announcement dated dated 12th December, 2025,<br>2. The Detailed Public Announcement dated 18th December, 2025,<br>3. The Letter of Offer dated 07th February, 2026. Based on the review of PA, DPS and LOF, the IDC of the opinion that the offer price of ₹10/- per Equity Shares as per Regulations 8(1) and 8(2) of the SEBI (SAST) Regulations, 2011. |
| 13. | Details of Independent Advisors, if any. | Nil |
| 14. | Any other matter(s) to be highlighted | Nil |

**Note:** The above stated information are only indicative in nature and contains minimum details with regard to the recommendations of IDC. IDC may include any other information under the respective headings which, in its view is relevant for shareholders of the TC for making an informed decision with respect to the open offer.

Statement by the IDC – "To the best of our knowledge and belief, after making proper enquiry, the information contained in or accompanying this statement is, in all material respect, true and correct and not misleading, whether by omission of any information or otherwise, and includes all the information required to be disclosed by the TC under the Takeover Code."

**Signature of the Authorised Signatory**
**Sd/-**
**Sonal Gandhi**
**Chairperson**

**Date:** February 12, 2026
**Place:** Ahmedabad, Gujarat

AdBaaz

संपादकीय

## कायद्याआडचा भ्रष्टाचार: संरक्षण की पळवाट?

भ्रष्टाचारमुक्त प्रशासन ही लोकशाहीची किमान अपेक्षा असते, पण जेव्हा भ्रष्टाचार रोखण्यासाठीच बनवलेल्या कायद्यातून संशयास्पद संरक्षण उभे राहते, तेव्हा प्रश्न गंभीर होतात. भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यातील कलम '१७ ए' हे आज त्याच कारणासाठी वादाच्या केंद्रस्थानी आले आहे. प्रामाणिक अधिकाऱ्यांना संरक्षण देण्याच्या नावाखाली चौकशीच थांबवली जात असेल, तर कायद्याचा हेतूच उलट दिशेने जातो. सर्वोच्च न्यायालयातील अलीकडच्या सुनावणीने हा पेच पुन्हा उघड केला असून, प्रशासनाची सोय आणि भ्रष्टाचाराविरुद्धचा लढा यातील सीमारेषा नेमकी कुठे आखायची, हा मूलभूत प्रश्न समोर उभा राहिला आहे.

भारतीय लोकशाहीच्या सुदृढ वाटचालीसाठी भ्रष्टाचारमुक्त प्रशासन हा कणा मानला जातो. सरकारी व्यवस्थेला लागलेली भ्रष्टाचाराची कीड मुळासकट उपटून काढण्यासाठी 'भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा' अस्तित्वात आला, परंतु याच कायद्यातील काही सुधारणा मूळ उद्देशालाच हरताळ फासणाऱ्या ठरत आहेत की काय, अशी शंका घेण्यास वाव देणारी स्थिती सध्या निर्माण झाली आहे. सर्वोच्च न्यायालयात नुकत्याच झालेल्या एका सुनावणीने हा विषय पुन्हा एकदा ऐरणीवर आणला आहे. 'सेंटर फॉर पब्लिक इंट्रेस्ट लिटिगेशन' या संस्थेने दाखल केलेल्या जनहित याचिकेवर सुनावणी करताना खंडपीठातील दोन न्यायमूर्तींमध्ये एकमत न झाल्याने या प्रकरणाने वेगळे वळण घेतले आहे. विशेषतः भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९८८ मधील कलम '१७ ए' च्या वैधतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. या कलमामुळे सरकारी अधिकाऱ्यांना चौकशीपासून जे संरक्षण मिळाले आहे, ते कायद्याच्या मूळ भावनेला छेद देणारे आहे की सनदी अधिकाऱ्यांच्या निर्णयक्षमतेला बळ देणारे, यावर न्यायवृंदातच दोन स्वतंत्र मतप्रवाह निर्माण झाले आहेत.

भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यातील कलम '१७ ए' नेमकी काय तरतूद करते, हे समजून घेणे अनिवार्य आहे. २०१८ मध्ये सुधारणेद्वारे समाविष्ट केलेल्या या कलमानुसार, कोणत्याही सरकारी अधिकाऱ्याने त्याच्या कर्तव्याचे पालन करताना घेतलेल्या निर्णयाबाबत जर भ्रष्टाचाराचे आरोप झाले, तर त्याच्या वरिष्ठांच्या पूर्वपरवानगीशिवाय पोलीस किंवा तपास यंत्रणा चौकशी करू शकणार नाहीत. या तरतुदीमागे सरकारचा तर्क असा होता की, प्रामाणिक अधिकाऱ्यांना धाडसी निर्णय घेताना विनाकारण चौकशीच्या फेऱ्यात अडकवले जाऊ नये. अनेकदा धोरणात्मक निर्णय घेताना हितसंबंधी गटांकडून तक्रारी केल्या जातात, ज्यामुळे अधिकारी निर्णय घेण्यास कचरतात. ही 'धोरणात्मक मरगळ' दूर करण्यासाठी हे कवच देण्यात आले. मात्र, याची दुसरी आणि अत्यंत गंभीर बाजू न्यायमूर्ती नागरत्ना यांनी आपल्या निकालपत्रात प्रभावीपणे मांडली आहे. त्यांच्या मते, भ्रष्टाचाराचे आरोप झाल्यानंतर चौकशीसाठी वरिष्ठांची पूर्वपरवानगी घेण्याची अट घालणे म्हणजे एक प्रकारे आरोपींना पाठीशी घालण्यासारखे आहे.

सरकारी व्यवस्थेतील भ्रष्टाचाराची साखळी बहुधा वरिष्ठांपासून कनिष्ठांपर्यंत विणलेली असते. अशा परिस्थितीत, जर कनिष्ठाच्या चौकशीची परवानगी त्याच साखळीतील वरिष्ठाकडे मागितली गेली, तर तिथे 'मी तुला सांभाळून घेतो, तू मला सांभाळून घे' अशीच प्रवृत्ती बळावण्याची दाट शक्यता असते. न्यायमूर्ती नागरत्ना यांनी याच मुद्द्यावर नेमके बोट ठेवले आहे. सरकारी निर्णय प्रक्रियेत कोणीही व्यक्ती स्वतंत्रपणे कार्य करत नसते. त्यामुळे चौकशीचा निर्णय घेण्याचे अधिकार वरिष्ठांना देणे हे नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वाच्या विरोधात आहे. जर वरिष्ठांनी चौकशीला नकार दिला, तर भ्रष्टाचार झाला होता की नाही, हे कधीच सिद्ध होऊ शकणार नाही. तपासच सुरू होऊ न देणे हे कायद्याच्या अंमलबजावणीतील सर्वात मोठे अडथळे ठरू शकतात. ज्या कायद्याचा उगमच भ्रष्टाचार रोखण्यासाठी झाला आहे, त्यामध्ये अशा प्रकारची सवलत देणे म्हणजे कायद्याच्या मूळ गाभ्यालाच धक्का लावण्यासारखे आहे.

या कलमाच्या घटनात्मक वैधतेवर चर्चा करताना भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद १४ मधील 'समानतेच्या अधिकाराचा' संदर्भ अत्यंत कळीचा ठरतो. कायद्यासमोर सर्व समान असताना केंद्र आणि राज्य सरकारमधील ठराविकच उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना चौकशीपूर्वी पूर्वपरवानगीची विशेष सवलत का मिळावी, हा प्रश्न उपस्थित होतो. सरकारी उतरंडीतील सर्व कर्मचाऱ्यांना हे संरक्षण मिळत नाही, याचाच अर्थ एकाच प्रकारच्या गुन्ह्यासाठी दोन वेगवेगळे निकष लावले जात आहेत. ही बाब घटनाबाह्य असल्याचे मत न्यायमूर्ती नागरत्ना यांनी व्यक्त केले आहे. यापूर्वी गाजलेल्या 'विनीत नारायण विरुद्ध केंद्र सरकार' या खटल्यातही सर्वोच्च न्यायालयाने अशाच प्रकारची तरतूद (कलम ६ ए) रद्द केली होती. आता पुन्हा एकदा वेगळ्या नावाने त्याच तरतुदींना कायद्यात स्थान देणे, हे न्यायालयाच्या आधीच्या निर्णयाशी विसंगत असल्याचे दिसून येते.

आजच्या समाजात भौतिक सुखांची लागलेली चढाओढ आणि संपत्तीचे ओंगळवाणे प्रदर्शन यामागे अनेकदा भ्रष्टाचाराचा काळा पैसा कारणीभूत असतो. भ्रष्टाचाराच्या माध्यमातून अनैतिक मार्गाने कमावलेली संपत्ती केवळ वैयक्तिक लाभ मिळवून देत नाही, तर ती सामाजिक नैतिकतेचा ऱ्हास करते. अशा अनैतिक संपत्तीवर आसूड ओढण्याची जबाबदारी तपास यंत्रणांची असते. मात्र, जर कायद्याच्या तांत्रिक तरतुदीच तपासाच्या मार्गात आडव्या येणार असतील, तर भ्रष्टाचाऱ्यांना जरब बसवणे कठीण होईल. न्यायमूर्ती नागरत्ना यांनी आपल्या निकालपत्रात एक अत्यंत संवेदनशील निरीक्षण नोंदवले आहे की, ज्यांच्या पालकांनी भ्रष्ट मार्गाने संपत्ती जमा केली आहे, त्यांच्या वारसांनी किंवा मुलांनी अशा संपत्तीचा त्याग केला पाहिजे. हे केवळ कायद्याचे पालन नसून ते एक सामाजिक उत्तरदायित्व आहे. जोपर्यंत वाममार्गाने मिळवलेली मालमत्ता जप्त करून कठोर संदेश दिला जात नाही, तोपर्यंत भ्रष्टाचाराची ही कीड कमी होणार नाही.

कष्ट करून कमावलेल्या पैशाचा आदर करणे ही संस्कृती आहे, परंतु लोकसेवकाच्या पदावर राहून जनहित डावलून स्वतःचे खिसे भरणे हा द्रोह आहे. देशातील कायद्याबद्दल आणि त्याच्या कठोर अंमलबजावणीबद्दल प्रत्येकाच्या मनात भीती असणे आवश्यक आहे, मग ती व्यक्ती कितीही प्रभावशाली का नसो. भीतीशिवाय शिस्त आणि पारदर्शकता निर्माण होऊ शकत नाही. कलम १७ ए ही भीतीच संपुष्टात आणण्याचे काम करत आहे. दोन न्यायमूर्तींच्या भिन्न मतांमुळे सध्या तरी हे कलम रद्द झालेले नाही आणि हे प्रकरण आता नव्या खंडपीठाकडे सोपवले जाईल. मात्र, या वादातून एक गोष्ट स्पष्ट होते की, प्रशासकीय सोय आणि भ्रष्टाचाराविरुद्धचा लढा यांच्यात संतुलन राखताना पारदर्शकतेलाच सर्वोच्च स्थान मिळायला हवे.

सत्तेच्या अधिकारापेक्षा सत्याचा शोध घेण्याची प्रक्रिया अधिक मुक्त असणे हीच लोकशाहीची गरज आहे. भ्रष्टाचाराच्या या चक्रव्यूहातून देशाला बाहेर काढण्यासाठी केवळ कायदे असून चालणार नाही, तर त्यातील पळवाटा बंद करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. वरिष्ठांची पूर्वपरवानगी घेण्याची अट ही चौकशीला विलंब लावणारी आणि पुरावे नष्ट करण्यास वाव देणारी ठरू शकते. भ्रष्टाचार ही केवळ कायदेशीर नव्हे, तर नैतिक आणि सामाजिक समस्या आहे. तपास सुरू होण्याआधीच परवानग्यांच्या अटी लावून जर चौकशीला ब्रेक बसत असेल, तर तो कायद्याचा गैरवापर ठरतो. प्रामाणिक निर्णय घेणाऱ्या अधिकाऱ्यांचे संरक्षण आवश्यकच आहे, पण त्याच वेळी भ्रष्टांना वाचवणारी ढाल तयार होता कामा नये. पारदर्शकता हीच लोकशाहीची खरी ताकद आहे. कायद्याच्या नावाखाली पळवाटा उघड्या ठेवल्या, तर भ्रष्टाचाराला रोखण्याचे स्वप्न कागदावरच राहील.

# एड्स : जागृतीची गरज!

संपूर्ण जगभरात एक डिसेंबरला 'जागतिक एड्स दिन' साजरा करण्यात येतो. एड्स हा एक गंभीर तसेच संक्रमित आजार असून या आजारामुळे जगभरात आतापर्यंत लाखो रुग्णांचे प्राण गेले आहेत. 'हयूमन इम्युनो डिफीशीयंसी व्हायरस' (एचआयव्ही) मुळे होणाऱ्या 'एक्वायर्ड ईम्युन डिफिशियनशी सिंड्रोम' (एड्स) या गंभीर आजाराबद्दल जगभरात जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि या आजाराने पीडित असलेल्या व्यक्तींना पाठिंबा दर्शवण्यासाठी आणि समर्थन देण्यासाठी दरवर्षी एक डिसेंबर हा दिवस जागतिक एड्स दिन म्हणून साजरा केला जातो.

१९८८ मध्ये हा दिवस पहिल्यांदा साजरा करण्यात आला. १९९६ मध्ये, संयुक्त राष्ट्र संघाने जागतिक स्तरावर एचआयव्ही / एड्सचा प्रचार आणि प्रसार करण्याचे काम हाती घेतले आणि १९९७ मध्ये 'जागतिक एड्स मोहिमे'अंतर्गत संसर्ग, प्रतिबंध आणि शिक्षण यावर काम करण्यास सुरुवात झाली. त्यानंतर जगभरात 'जागतिक एड्स दिन' साजरा केला जाऊ लागला.

१९ व्या शतकात पहिल्यांदाच आफ्रिकेतील माकडांच्या विशिष्ट प्रजातीमध्ये एड्स चे विषाणू आढळले. हा रोग माकडांच्या माध्यमातून माणसांमध्ये पसरला. १९५९ मध्ये, एचआयव्ही विषाणू पहिल्यांदा एका आजारी काँगोली माणसाच्या रक्ताच्या नमुन्यात त्याच्या मृत्यूनंतर आढळून आला. तो पहिला एचआयव्ही बाधित व्यक्ती असल्याचे मानले जाते. १९६० मध्ये हा रोग आफ्रिकेतून हैती आणि कॅरिबियन बेटांवर पसरला. त्यानंतर १९७० च्या दशकात हा विषाणू कॅरिबियन ते न्यूयॉर्क शहरापर्यंत पसरला आणि नंतर अमेरिकेपासून उर्वरित जगामध्ये फैलावला. पुढे १९८० नंतर हा रोग जगभर खूप वेगाने पसरला. तेव्हापासून जगभरातील लाखो लोकांना एड्समुळे आपला जीव गमवावा लागला आहे.

भारतात, जागतिक आरोग्य संघटना आणि सरकारच्या सततच्या प्रयत्नांमुळे, एचआयव्ही संसर्ग प्रतिबंधात्मक उपायांचा परिणाम संसर्ग दर आणि एड्समुळे होणारे मृत्यू कमी होण्यात स्पष्टपणे दिसून येत आहे. युनायटेड नेशन्स एजन्सी 'यूएनएड्स' च्या अहवालानुसार, २०१० पासून भारतात एचआयव्ही संसर्गाचे प्रमाण ४२ % पेक्षा जास्त कमी झाले आहे, तर २०१० पासून एड्समुळे एकूण मृत्यूचे प्रमाण देखील सुमारे ७७ % ने कमी झाले आहे. तथापि, एड्सला सामोरे जाण्याचे गंभीर आव्हान लक्षात घेता, २०३० पर्यंत एड्स संपुष्टात आणण्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी जगातील सर्व विकसित आणि विकसनशील देशांनी एकत्र येऊन या कामात पूर्ण योगदान देण्याची नितांत गरज आहे.

**एड्स :** लक्षणे, कारणे आणि उपाययोजना

एड्स अशा अवस्थेला म्हणतात, जिथे रोगप्रतिकारक शक्ती पूर्णतः कमी होते आणि रुग्ण अनेक जीवघेण्या संसर्गांना बळी पडतो.



**लक्षणे:**

१. दीर्घकाळ ताप आणि घाम येणे
२. वजन अचानक कमी होणे
३. सतत थकवा वाटणे
४. त्वचेवर लालसर चट्टे किंवा गाठ निर्माण होणे
५. सतत सर्दी किंवा ताप होणे
६. तोंडात किंवा घशात जखमा

**कारणे:**

१. असुरक्षित लैंगिक संबंध
२. दूषित सुईचा वापर
३. बाधित रक्ताचा हस्तांतरण
४.संक्रमित आईकडून बाळाला झालेला संसर्ग

**उपाययोजना:**

१. **जागरूकता:** एड्सच्या प्रसाराच्या कारणांबद्दल माहिती देणे व सुरक्षित वर्तनाचे महत्व सांगणे.

२. **उपचार:** एंटीरेट्रोव्हायरल थेरपी (ART) रुग्णांना आयुष्य वाढवण्यात मदत करते.

३. **सुविधा:** एड्स ग्रस्तांसाठी मोफत उपचार, सल्ला केंद्रे, आणि चाचणी सेवा उपलब्ध करणे.

४. **समर्थन:** एड्सग्रस्तांना मानसिक आधार व भेदभाव नष्ट करण्यासाठी प्रयत्न.

५. **संशोधन:** नवीन औषधे आणि लस शोधण्यासाठी संशोधनाला प्रोत्साहन.

**भारत आणि जागतिक स्थिती:**

युनायटेड नेशन्स एड्स प्रोग्राम (UNAIDS) च्या अहवालानुसार, २०२३ साली जगभरात सुमारे ३९ दशलक्ष लोक एचआयव्ही बाधित होते. नॅशनल एड्स कंट्रोल ऑर्गनायझेशन (NACO) च्या २०२३ च्या अहवालानुसार, भारतात सुमारे २.४ दशलक्ष लोक एड्सग्रस्त आहेत. महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, आणि कर्नाटक ही प्रमुख बाधित राज्ये आहेत. भारतात २०१० च्या तुलनेत नवीन संसर्ग ३९ टक्के कमी झाले आहेत, ज्यामुळे प्रतिबंधात्मक उपायांची प्रभावशीलता दिसून येते.

एड्स हा आजार शारीरिक स्वास्थ्यासह सामाजिक व आर्थिक समस्या देखील निर्माण करतो. परंतु, योग्य उपचार, जागरूकता आणि समाजाच्या पाठिंब्याने एड्सचे प्रमाण कमी करणे शक्य आहे. या जागतिक एड्स दिवसाच्या निमित्ताने प्रत्येकाने एड्सविषयी समज वाढवावी आणि समाजाप्रती आपले कर्तव्य निभावावे. 'भेदभाव संपवा, मदत पोहचवा आणि एड्स रोखा' हाच एड्स दिनाचा संदेश!

# सृष्टीचे पालनहार "देवादी देव महादेव"

❒ रमेश लांजेवार

भोले शंकर संपूर्ण सृष्टीचे व सर्वांचेच तारणहार दैवत आहे. असे सांगण्यात येते की संपूर्ण ब्रम्हांडामध्ये ३३ कोटी देवी-देवतांचा वास आहे. परंतु यात सर्वांचे पालनहार देवादी देव महादेव म्हणजेच "शिव-पार्वती" आहे. त्यामुळे शंकरजीला भोल्या शंकरा म्हटल्या जाते. समुद्र मंथनाच्या वेळेस जे विष निघाले ते शंकरजीनी प्राशन करून संपूर्ण सृष्टीला वाचविले व विष प्राशन केल्याने त्यांचा कंठ निळा झाला. शंकराचा वास सर्वसाधारण ठिकाणापासून तर स्मशान भूमीपर्यंत दिसून येतो. म्हणजेच आकार -पाताळ-पुर्व-पश्चिम-उत्तर-दक्षिण या संपूर्ण ठिकाणी आपल्याला कोणत्या ना कोणत्या रूपात भगवान शंकरजींचे



दर्शन अवश्य होते. त्यामुळेच हिंदु मान्यतेनुसार शंकराच्या मुर्तीची किंवा पिंडाची पुजा केली जाते. भोले शंभर सर्वसामान्यांचेच देवता नसुन मानव-देव -दानव-किन्नर सर्वांचे आराध्य दैवत आहे. त्यामुळे आजही नागव्दार, महादेव, पचमडी इत्यादी अनेक ठिकाणी हजारोंच्या संख्येने भाविक दरवर्षी महादेवाच्या दर्शनाला जातात व भोल्या शंकराचे दर्शन घेऊन आपली मनोकामना पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. रावनासारखा महाग्यानी घोर राजनितीज्ञ हा सुद्धा शंकरजीचा कट्टर भक्त होता. रावणाची भक्ती पाहून शंकरजी प्रसन्न होऊन त्यांना बलशाली होण्याचे वर्दानसुध्दा दीले होते. त्यामुळे शंकरजीची पुजा करण्याचा अधिकार सर्वांनाच आहे. कारण शंकरजींची महीमा अपरंपार आहे. याच उद्देशाने शंकरजींनी आपले वास्तव्य सर्वसामान्यांपासून तर स्मशान भुमीपर्यंत अजरामर ठेवले आहे. आज स्थल, जल, वायु, आकाश-पाताळ, पुर्व-पश्चिम, उत्तर- दक्षिण या संपूर्ण ठिकाणी आपल्याला भोले शंकराचे दर्शन होते. आज आपण नद्यांचा उगम पहातो तो उगम शंकरजींच्या जटेतुन झाल्याचे अनेक कथा व पुराणात पहातो. कोणी मानो अथवा न मानो परंतु आपण या पृथ्वीतलावर हसतो, खेळतो, बागडतो यांचे मुख्य कारण म्हणजे या ब्रम्हांडातील देवी-देवतांचा वासच आहे. कोणतीही देवी-देवता असो त्यांचे स्मरण केल्याने मानसाच्या ह्रदयात व मनात एक उत्सहाचे वातावरण निर्माण होते नवीन ऊर्जा निर्माण होते. कोणताही देव दीसत नसला तरी मनात असला पाहिजे व संपूर्ण शक्ती सत्कर्मासाठी समर्पीत केली पाहिजे. आज संपूर्ण निसर्ग जो आपल्याला दिसतो त्यात लाखोंच्या संख्येने अनेक वृक्ष, फुले, फळे दिसून येते ही संपूर्ण ईश्वरी देनच आहे. परंतु संपूर्ण निसर्गाची रक्षा करने मानवजातीचे प्रथम कर्तव्य आहे. आपण सत्कर्माचा मार्ग अवलंबवीला तर देवादी देव महादेव आपणापर्यंत अवश्य येईल. महाशिवरात्री हा हिंदू धर्माचा पवित्र सन आहे. त्यामुळे महाशिवरात्री हा सन मोठ्या भक्तिभावाने सर्वत्र साजरा केल्या जातो. त्यामुळे आपल्याला सर्वत्र उत्सहाचे व मंगलमय वातावरण दिसून येते. महाशिवरात्रीला बेलपत्ती, गोंगलाचे फुले, आंब्याचे पाणीखायचे पान याला जास्त महत्व असते. म्हणजे पृथ्वीतलावरील प्रत्येक झाडाला, फळांना किंवा फुलांना आगळेवेगळे महत्व असते हे आपल्याला दिसुन येते. महादेवाचे गुणगान गाण्यांच्या स्वरूपात आपल्याला ऐकायला व पहायला मिळते. संपुर्ण भारतात १२ ज्योतिर्लिंग आहेत त्यापैकी ५ महाराष्ट्रात आहे. त्र्यंबकेश्वर, परळी बैजनाथ, भिमाशंकर, औंढा नागनाथ, घृष्णेश्वर ही बाब महाराष्ट्राच्या दृष्टीने गौरवशाली बाब आहे. या व्यतीरीक्त महाराष्ट्रासह भारतात भगवान शंकरजीचे अनेक मंदिरे आहेत. यावरून स्पष्ट होते की भगवान शंकरजीवर सर्वांचीच आस्था आहे. त्याच प्रमाणे ॐ नमोः शिवाय ,ॐ शांती, हर हर महादेव इत्यादींचा जप केल्याने मन प्रसन्न रहाते, शांती मिळते, आरोग्याच्या दृष्टीकोणातु ओम नमो शिवाय हा जप महत्वपूर्ण मानल्या जातो यामुळे अनेक आजार दुर होण्यास मोठी मदत मिळते. आपण भोले शंकराचा जयघोष शिवकालीन इतिहासामध्ये सुध्दा ऐकली व पहाली आहे. शिवाजी महाराज व मावळे लढाईवर जातांना "हर हर महादेव"चा जयघोष करीत असे.यामुळे सैनिकांमध्ये नवचैतन्य निर्माण होवून एक नवीन उर्जा निर्माण होत होती. त्याचप्रमाणे आजही आपल्याला प्रत्येक शंकरजींच्या मंदिरात भाविकांचा "हर हर महादेव "चा जयघोष ऐकायला मिळतो. यामुळे सर्वांचेच मन प्रसन्न होते व नवीन ऊर्जा निर्माण होते. याचे मुख्य कारण म्हणजे देवादी देव महादेव हे सर्वांचेच पालनहार दैवत आहे. महाशिवरात्रीच्या सणाला लहान -मोठे, आबालवृद्धा सारखे संपूर्ण भावीक मोठ्या उत्साहाने उपवास ठेवतात यामागचा एकच उद्देश असतो की हे देवादी देव महादेव येणारे विग्न टळुदे व सुख-शांती प्रदान कर. कारण आपण सुखी तर देश सुखी, देश सुखी तर संपूर्ण सृष्टी सुखी. महाशिवरात्रीच्या निमित्ताने मी हेच सांगु इच्छितो की स्थल, जल, वायु व निसर्ग याची जोपासना मानवजातीने वेळोवेळी केलीच पाहिजे.

कारण बदलते हवामान व यामुळे वाढते प्रदुषण, जंगलातील हिंसक पशु शहरात प्रवेश करने, जंगलाला वनवे लागने, हिमकडा कोसळुन महाप्रलय येणे, सुनामी, ज्वालामुखीचा उद्रेक, अती उष्णता,अती थंडी, भुकंप याला रोखण्यासाठी संपूर्ण मानवजातीने निसर्गाची जोपासना केलीच पाहिजे. अन्यथा देवादी देव महादेव विक्राळ रूप सुध्दा धारण करू शकते. यालाही नाकारता येणार नाही. याचे अनेक उदाहरणे आपल्या समोर आहे. आपण निसर्गाची निर्मळ मनाने सेवा व जोपासना केली तर देवांदी देव महादेव अवश्य प्रसन्न होतील. यात दुमत नाही. देशात महाप्रलय, भुकंप, अती उष्णता, अती थंडी, सुनामी,वनवा लागणे, प्रदुषणात वाढ होणे व हवामानातील बदल या संपूर्ण गोष्टी निसर्गावर होत असलेल्या अन्याय व अत्याचारामुळे दिसून येते. देवादी देव महादेवाचा वास दऱ्या-खोऱ्यात, पहाडात, जंगलात, निसर्गानच्या सान्निध्यातील काणा -कोपऱ्यात व कणाकणात आपल्याला पहायला मिळतो. त्यामुळे महाशिवरात्रीच्या सनाच्या निमित्ताने निसर्गाची जोपासना करण्यासाठी सर्वांनीच संकल्प केला पाहिजे व निसर्ग संपदा विनाशापासुन वाचविली पाहिजे. महाशिवरात्रीच्या निमित्ताने प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावले पाहिजे. कारण प्रत्येक वृक्षाच्या पानात, फुलात, फळात आपल्याला भोले शंकराचे दर्शन अवश्य होईल. त्याचबरोबर वृक्ष लागवडीमुळे गुरांना चारा, मानवाला शुद्ध हवा व सर्वांनाच शुद्ध ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल. महाशिवरात्रिच्या निमित्ताने जर वृक्षलागवड झाली तर देशात एकाच दिवशी लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड सहज होईल व निसर्ग प्रफुल्लित होण्यास मोठी मदत मिळेल. हर हर महादेव!

**PUBLIC NOTICE**

Take notice that My Clients, **1)MR. VILAS RAMCHANDRA JADHAV 2)MR. VIJAY RAMCHANDRA JADHAV 3)MR. PRAKASH RAMCHANDRA JADHAV 4)MRS. VRUSHALI JAGANNATH KORLEKAR 5)MRS. BHARATI VASUDEV GHOLAM** have instructed me to invite objection in respect of **FLAT NO.101 ON THE FIRST FLOOR OF BUILDING NO.C-29 KNOWN AS PIYUSH SHANTINAGAR CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LTD. situated at BLDG.NO.C-14/29, SECTOR-2, SHANTI NAGAR , MIRA ROAD(EAST), THANE-401107*(here referred to as the "said flat")***, In Short. **LATE MRS. SITABAI RAMCHANDRA JADHAV** was **originally an owner of the said flat, who died on 18-05-2009 , who had only Six Legal Heirs** including **1)MR. RAMCHANDRA G. JADHAV (Husband) 2)MR VILAS RAMCHANDRA JADHAV (Son)**, who had completed all requisite formalities as per the M.C.S.Act, 1960 & Bye -Laws of the society and submitted an application along with relevant documents to the said society require for the membership and said society accepted and admitted them legal and lawful joint members and joint owners of the said flat and transfer the **Share Certificate** in the name of **1)MR. RAMCHANDRA G. JADHAV 2)MR. VILAS RAMCHANDRA JADHAV** and **MR. RAMCHANDRA G. JADHAV also died on 20-02-2025**, and left behind only **Five Legal Heirs** including **1)MR. VILAS RAMCHANDRA JADHAV (Son) 2)MR. VIJAY RAMCHANDRA JADHAV (Son) 3)MR. PRAKASH RAMCHANDRA JADHAV(Son) 4)MRS. VRUSHALI JAGANNATH KORLEKAR(Daughter) 5)MRS. BHARATI VASUDEV GHOLAM (Daughter)** hence; **MR. VILAS RAMCHANDRA JADHAV (Son)** has applied for the **sole ownership of the said flat in his sole name and the Other Legal Heir including 1)MR. VIJAY RAMCHANDRA JADHAV 2)MR. PRAKASH RAMCHANDRA JADHAV 3)MRS. VRUSHALI JAGANNATH KORLEKAR 4)MRS. BHARATI VASUDEV GHOLAM** has consented for the same.

Any person or persons having any objection for grant of membership or having any claim, right, title or interest or any part thereof either by way of inheritances, heirship or mortgage, lease, leave and license, sale or lien, charge, trust, easement, license, tenancy, injunction, possession, exchange, attachment of the Income Tax Authorities or otherwise howsoever are requested to make the same known in writing within **15 Days** along with the supporting documents to the undersigned at **B-706, Asmita Regency-1, Naya Nagar, Mira Road(East), Thane-401107** within **Fifteen Days (15)** from the date of publication hereof, failing which all such claims and /or objections, if any will be considered as waived and abandoned.

**ADV. RAMSHA KHATIB**
**(B.L.S L.L.B)**
**9821715184**

Date:12-02-2026
Place: Mira Road

**महाराष्ट्र शासन वनविभाग उत्तर कोकण**

**वनपरिक्षेत्र अधिकारी, पश्चिम मुंबई, (कांदळवन) यांचे कार्यालय**

वनपरिक्षेत्र कांदळवन कक्ष, पश्चिम मुंबई मध्ये खालील बांधकाम करणे कामी खुली निवीदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाचे ठिकाण | प्रत्यक्ष कामाची रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | Providing & Erecting Permanant Boundary Demarcation Piliars for "Diversion of 0.2105ha Forest (Mangrove) Land in favour of Municipal Corporation of Greater Mumbai for Construction of Vehicular Bridge at the Junction of Yari road & Lokhandwala back road near Amarnath Tower Building in village Versova, taluka Andheri (West) Dist- Mumbai Suburban in the state of Maharashatra" of West Mumbai Range of Mangrove Division-North Konkan. | West Mumbai Range Borivali | 27812/- |

**निवीदा संबंधी सूचना अटी व शर्ती**

1. जाहिरात प्रसिध्दी नंतर कोऱ्या निवीदा रु. 100/- प्रती रोख भरुन वनपरिक्षेत्र अधिकारी, पश्चिम मुंबई, (कादंळवन) यांचे कार्यालयातून निवीदा कार्यालयीन वेळेत उपलब्ध होतील.
2. निवीदा कार्यप्रणाली मध्ये प्रसिध्दीच्या दिवसापासून 7 व्या दिवसापर्यंत सकाळी 11:00 वाजेपासुन सायंकाळी 05:00 वाजेपर्यंत भरता येतील व स्विकारले जातील.
3. निविदा भरल्यानंतर आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह बंद लिफाफ्यात देणे बंधनकारक असेल.
4. शासन निर्णयाप्रमाणे आयकर व त्यावरील अधिभार तसेच जीएसटी ची रक्कम देय रक्कमेतून वसुल करण्यात येईल.
5. कोणतेही कारण न देता 01 किंवा सर्व निवीदा नाकारण्याचा अधिकार वन परिक्षेत्र अधिकारी, पश्चिम मुंबई, (कादंळवन) यांनी राखुन ठेवला आहे व त्याचा निर्णय निवीदाधारकांसाठी अंतिम व बंधनकारक राहील.
6. प्रत्यक्ष कामाची रक्कम ही जी.एस.टी विरहीत आहे. शासन निर्णयाप्रमाणे जी.एस.टी रक्कम आपणांस वेगळ्याने अदा करण्यात येईल.

**स्वाक्षरी/-**
**(एस. जी. कवठे)**
**वनपरिक्षेत्र अधिकारी,**
**पश्चिम मुंबई (कांदळवन)**

**DGIPR/2025-2026/5723**

**ॲक्विलॉन नेक्सस लिमिटेड**

**(पूर्वी श्री अधिकारी ब्रदर्स टेलिव्हिजन नेटवर्क लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे)**

**सीआयएन : L62090MH1994PLC083853**

**नोंदणीकृत कार्यालय : ६ वा मजला, अधिकारी चेंबर्स, ओबेरॉय कॉम्प्लेक्स, न्यू लिंक रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०० ०६३.**

**दूरध्वनी : ०२२-२६३९५४००/०२२-४०२३००००, फॅक्स : ०२२-२६३९५४५९**

**ईमेल : investorservices@adhikaribrothers.com & info.sriadhikari@gmail.com वेबसाइट : www.aqylon.co**

**३१ डिसेंबर, २०२५ अखेर तिमाही आणि नऊ महिन्यांसाठी अलेखापरीक्षित स्थायी वित्तीय अहवालाचा निष्कर्श**

**(रु. लाखात, ईपीएस वगळता)**

| अ. क्र. | विवरण | स्थायी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तिमाही अखेरकरिता | | | वर्ष अखेरकरिता | | |
| | | ३१ डिसेंबर २०२५ (अलेखापरीक्षित) | ३० सप्टेंबर, २५ (अलेखापरीक्षित) | ३१ डिसेंबर, २४ (अलेखापरीक्षित) | ३१ डिसेंबर, २५ (अलेखापरीक्षित) | ३१ डिसेंबर, २४ (अलेखापरीक्षित) | ३१ मार्च, २५ (लेखापरीक्षित) |
| १. | कार्यचलनातून एकूण उत्पन्न | ४९४.६५ | ४३४.२८ | २४४.१७ | ९६६.०० | ४७०.८८ | ६१४.६० |
| २. | कालावधीसाठी निव्वळ नफा (तोटा)(कर, अपवादात्मक आणि/किंवा अतिविशेष बाबी पूर्व) | १४८.०६ | (१३२.९८) | ११.५५ | (१६८.४९) | ३५.१७ | ४७.४५ |
| ३. | कर पूर्व कालावधीसाठी निव्वळ नफा (तोटा) (अपवादात्मक आणि असाधारण बाबी पश्चात) | १४८.०६ | १,४१०.६० | (२,२७२.७३) | १,३७५.१० | (२.२४९.११) | (२,२३६.८३) |
| ४. | कर पश्चात कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा अतिविशेष बाबी पश्चात) | १४८.०६ | १,४१०.६० | (२,२७२.७३) | १,३७५.१० | (२,२४९.११) | (२,२३५.८३) |
| ५. | कर पश्चात कालावधीसाठी एकूण व्यापक उत्पन्नकर नंतरच्या कालावधीसाठी नफा तोटा समाविष्ट करून आणि इतर व्यापक उत्पन्न (कर पश्चात) | १४८.०६ | १,४१०.६० | (२,२७२.७३) | १,३७५.१० | (२,२४९.११) | (२,२३५.८३) |
| ६. | प्रदानित इक्विटी शेअर भांडवल (दर्शनी मूल्य रु. १०/- प्रत्येकी) | २,५३७.३१ | २,५३७.३१ | २,५३७.३१ | २,५३७.३१ | २,५३७.३१ | २,५३७.३१ |
| ७. | राखीव (पुनर्मूल्यांकन राखीव वगळून) गत वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंदामध्ये निर्देशित | - | - | - | - | - | (३,६८०.८९) |
| ८. | उत्पन्न प्रति शेअर (रु. १०/- प्रत्येकी) | | | | | | |
| | मूळ | ०.५८ | ५.५६ | (८.९६) | ५.४२ | (८.८६) | (८.८२) |
| | सौम्य | ०.५८ | ५.५६ | (८.९६) | ५.४२ | (८.८६) | (८.८२) |

टीप :

१. कंपनीचे वरील स्वतंत्र आर्थिक निकाल लेखापरीक्षण समितीने पुनरावलोकन केले आहेत आणि बुधवार, ११ फेब्रुवारी, २०२६ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत मंजूर केले आहेत. वैधानिक लेखापरीक्षकांनी ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊ महिन्यांसाठी या स्वतंत्र आर्थिक निकालांचा आढावा घेतला आहे आणि ते वेबसाइटवर उपलब्ध करून दिले आहेत. कंपनी **www.adhikaribrothers.com** आणि बीएसई लिमिटेडची वेबसाइट **www.bseindia.com** आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड **www.nseindia.com** वर आहे जिथे कंपनीचे शेअर्स सूचीबद्ध आहेत.
२. कंपनी एकाच विभागात काम करत आहे म्हणजेच कंटेंट उत्पादन आणि वितरण. त्यामुळे निकाल एकाच विभागात नोंदवले जातात.
३. ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊ महिन्यांसाठीचे स्वतंत्र अलेखापरीक्षित आर्थिक निकाल, कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३३ अंतर्गत विहित केलेल्या भारतीय लेखा मानके (आयएनडी एएस) मध्ये घालून दिलेल्या ओळख आणि मापन तत्त्वांनुसार तयार केले गेले आहेत, त्याअंतर्गत जारी केलेल्या संबंधित नियमांसह आणि भारतात सामान्यतः स्वीकारल्या जाणाऱ्या इतर लेखा तत्त्वांसह.
४. इतर इक्विटी शिल्लक फक्त कंपनीच्या स्वतंत्र वित्तीय वर्षाच्या अखेरीस ऑडिट केलेल्या आकडेवारीच्या आधारे दिले जातात.
५. ८ डिसेंबर २०२३ रोजी माननीय एनसीएलटीच्या आदेशाने मंजूर केलेल्या रिझोल्यूशन प्लॅननुसार, कंपनीने ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या नऊ महिन्यांत अंधेरी येथील काही स्थावर मालमत्ता विकल्या आहेत. अशा मालमत्तेच्या विक्रीवरील नफा आणि मालमत्तेच्या विक्रीशी संबंधित इतर खर्च १,५४३.५९ लाख रुपये असा अपवादात्मक आयटम म्हणून ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या नऊ महिन्यांत दाखवण्यात आला आहे.
६. चालू वर्षाच्या लेखा उपचारांशी सुसंगत राहण्यासाठी आवश्यकतेनुसार आकडेवारीचे पुनर्गठन/पुनर्रचना/पुनर्वर्गीकरण/पुनर्रचना करण्यात आली आहे.

**ॲक्विलॉन नेक्सस लिमिटेडकरिता**
**(पूर्वी श्री अधिकारी ब्रदर्स टेलिव्हिजन नेटवर्क लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे)**
**सही/-**
**श्रीवत्सव सुनकरा, व्यवस्थापकीय संचालक**
**डीआयएन : ०१७२५४३१**

**ठिकाण : मुंबई**
**तारीख : ११ फेब्रुवारी २०२६**